# पोलीस स्टेशन धामणगाव बढे

पोलीस स्टेशन धामणगाव बढे हद्दीतील छत्रपती शिवाजी विद्यालय सिंदखेड येथे सहा. पोलीस निरीक्षक नागेश जायले, यांच्या उपस्थितीमध्ये नवीन कायदे भारतीय न्याय संहिता- 2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता- 2023 आणि भारतीय साक्ष अधिनियम, 2023 तसेच I.T. Act, सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर व महिला संबंधी घडणारे अपराधा संबंधाने घ्यावयाची दक्षता, तसेच पोक्सो कायद्या अंतर्गत माहिती देऊन कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत अंदाजे 150 विदयार्थ्यांसह शिक्षकवृंद यांनी हजेरी लावली होती.

समाजामध्ये सोशल मीडिया व इतर प्रसार माध्यमांद्वारे सुरू असलेल्या फसवणुक प्रकरणात सतर्क राहून आपणाकडून कायद्याचे कुठलेही उल्लंघन होणार नाही व अशा घटनांपासून स्वत:चा बचाव कसा करावा पोलिसांची व विधी सल्लागार यांची मदत कशी घ्यावी तसेच कायदेशीर मार्गदर्शन कसे प्राप्त करावे याबाबत उपस्थीत मान्यवरांकडुन मार्गदर्शन करण्यात आले.





स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०